गोवादूत : पणजी – गुरुवार, २८ जानेवारी २०१६

# नवसमाज निर्मितीसाठी कटिबद्ध व्हावे

## ➲ डॉ. सोमनाथ कोमरपंत यांचे हळबे महाविद्यालयात प्रतिपादन

**दोडामार्ग, दि. २५ (प्रतिनिधी)**

[illegible] व युवती हे राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या बाहूत अमर्याद शक्ती असते ते समाज बदलू शकतात. प्रतिकूलतेचे अभेद्य खडक फोडण्याची अमर्याद ऊर्जा त्याच्या अंगी असते. तरुणांचे कोणतेही स्वप्न लहान नसते तर भव्यतेचा आणि दिव्यतेचा त्याला स्पर्श असतो. आपली स्वप्ने त्यांनी राष्ट्र निर्मितीच्या स्वप्नात गुंफली तर एक देदीप्यमान राष्ट्र घडेल. मात्र युवकांनी आपल्या अवती-भवतीच्या परिस्थितीचे अवलोकन करावे, संस्कृतीतील शांती, सत्य, अंहिसा, समता, स्वातंत्र्य आदी मूल्ये आत्मसात करावी. प्रत्येक युवकाने जातिभेद विरहीत नवसमाज निर्मितीसाठी कटिबद्ध व्हावे, असे विचार गोवा विद्यापीठाचे माजी मराठी विभाग प्रमुख व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सोमनाथ कौमरपंत यांनी मांडले. ते येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख अतिथी या नात्याने बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. विवेकानंद नाईक होते.




➲ *विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. कोमरपंत. सोबत विवेकानंद नाईक, भाई परमेकर, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील आणि मान्यवर.*

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. कोमरपंत पुढे म्हणाले की, राष्ट्रीय नवनिर्माणामध्ये विज्ञान दृष्टी आत्मिक बळ, भौतिक परिवर्तन, सामाजिक बांधीलकी, सामाजिक समता, शिक्षण समाज सुधारकांची स्मृती आदी बाबी तरुणांनी अंगी बाळगल्या पाहिजेत. खेड्या-पाड्यात पर्यंत विचार पोहचविण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

यावेळी व्यासपीठावर नवनिर्माण शिक्षण संस्थेचे सदस्य भाई परमेकर, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, विवेकानंद नाईक, नगरसेविका रेश्मा कोरगांवकर आदी उपस्थित होते. दीप प्रज्वलनानंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून यावर्षी प्रथमच दोडामार्ग नगरपंचायत निवडणुकीत निवडून आलेल्या नगरसेवकांचा सत्कार प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कॉलेज क्वीन सायली गवस, कॉलेज किंग राजेश नाईक तर आदर्श विद्यार्थी म्हणून प्रीती अंकुश गवस यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले. अहवाल वाचन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. दिलीप बर्वे, सूत्रसंचालन प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे तर आभार प्रा. डॉ. एस. यु. दरेकर यांनी मानले. संध्याकाळी ४.०० वा. अंतर्नाद या सांस्कृतिक महोत्सवाला सुरुवात झाली.